Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक २२ ] मंगळवार, ऑगस्ट २६, २०२५/भाद्रपद ४, शके १९४७ [ पृष्ठे २, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५८.

**नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, यांजकडून**

**चांदूर बाजार शहराच्या प्रारुप विकास योजनेमधील फेरबदल/बदलांच्या अनुषंगाने सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये प्रसिद्धीकरण**

**सूचना**

क्रमांक वि.यो. चांदूरबाजार-कलम २८(४) ससंनर-अम-१५८०-२०२५.—

ज्याअर्थी, चांदूर बाजार नगरपरिषदेने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रारुप विकास योजना दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ चे सूचनेद्वारे नागरिकांच्या सूचना हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात अमरावती विभागीय पुरवणी भाग-१-अ (असाधारण) मध्ये दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम ३० अन्वये नियोजन प्राधिकरण विहीत मुदतीत (वाढीव मुदतीसह) शासनास सादर करण्यास असमर्थक ठरल्याने, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी उक्त अधिनियमाचे कलम २१ (४ क) अन्वये नमूद तरतुदीनुसार, उक्त अधिनियमाचे कलम २६ नंतरची कार्यवाही करून उक्त अधिनियमाचे कलम ३० नुसार विकास योजना शासनास सादर करण्यासाठी व आवश्यक सर्व कार्यवाही करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, अमरावती यांची "नियुक्त अधिकारी" म्हणून दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी च्या आदेशान्वये नेमणूक केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, नियुक्त अधिकारी यांनी उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये प्रारूप विकास योजनेमध्ये व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये कोणताही बदल न करता सदर प्रारूप विकास योजना शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी ठराव क्रमांक १, दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ पारित केलेला आहे ;

आता, त्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियुक्त अधिकारी यांनी उक्त अधिनियमाचे कलम २८(४) नुसार कोणतेही फेरबदल/बदल केलेले नाहीत.

**नम्रता स. सावरकर,**

अमरावती :
दिनांक १९ ऑगस्ट, २०२५.

नियुक्त अधिकारी-विकास योजना, चांदूर बाजार तथा
सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय,
अमरावती.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५९.

BY APPOINTED OFFICER AND ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING

**Publication of List of Modifications/Changes in Draft Development Plan of Chandur Bazar U/s 28(*4*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

*NOTICE*

No. D. P. Chandur Bazar-Section-28(*4*)-ADTP-AM.-1580-2025.–

Whereas, Chandur Bazar Municipal Council, being Planning Authority, has published the Draft Development Plan of Chandur Bazar u/s 26(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, *vide* notice dated 17th February, 2023 for inviting suggestions/objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazette of Amravati Division, Supplement Part 1-A, dated 17th February, 2023.

And whereas, as the Planning Authority has been unable to submit the said Development Plan to the Government within the prescribed time limit (including extension) under Section 30 of the said Act, Joint Director, Town Planing, Amravati Division, Amravati, in accordance with the provisions mentionded under Section 21 (*4 C*) of the said Act, has appointed Assistant Director, Town Planning, Amravati as the Appointed Officer to submit the Development Plan to the Government and take all necessary action under Section 30 of the said Act, *vide* Order dated 14th January, 2025.

And whereas, the Appointed Officer passed Resolution No. 1, dated 19th August, 2025 to submit the said Plan for sanction to the Government u/s 30 of the said Act without any modifications/changes in published Draft Development Plan of Chandur Bazar u/s 26 (*1*) of said Act ;

Now, therefore, modifications/changes made u/s 28 (*4*) of the Act are none, by the Appointed Officer.

NAMRATA S. SAWARKAR,

Amravati :
Dated the 19th August, 2025.

Appointed Officer, Development Plan Chandur Bazar,
Assistant Director, Town Planning, Branch Office,
Amravati.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.